पारपत्र सुविधेसाठी "ना-हरकत प्रमाणपत्र" मिळविण्याबाबत......

GR1985093001

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक – सीडीआर-१०८५/१३१८/३१/अकरा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ३० सप्टेंबर, १९८५.

प रि प त्र क

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-टीआरजी-१४६९/सी-८८२९-डी-१, दिनांक ३० सप्टेंबर १९६९ मधील सूचनांनुसार पारपत्र सुविधा मिळवू इच्छिणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याने पारपत्रासाठी आवेदनपत्र देण्यापूर्वी त्यांच्या विभाग प्रमुखांकडून व विभाग प्रमुखाने शासनाकडून "ना हरकत प्रमाणपत्र" मिळविणे आवश्यक आहे.

२. पारपत्र अधिनियम, १९६७ आणि पारपत्र नियम, १९८० अन्वये सर्वसाधारण पारपत्र मिळविण्यासाठी विहित केलेल्या आवेदनपत्राच्या नमुन्यानुसार राज्य/केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांस किंवा सांविधिक संस्था अथवा सार्वजनिक उपक्रम यांच्या कर्मचाऱ्यांस त्यांच्या विभागाकडून "ना हरकत प्रमाणपत्र" मिळवून ते मूळ प्रतीत सादर करावे लागते. असे प्रमाणपत्र देण्यापूर्वी कोणत्या बाबी पडताळून पाहणे आवश्यक आहे यासंबंधीची पुढील मार्गदर्शक तत्वे केंद्र शासनाच्या विदेश मंत्रालयाने, [पी. व्ही. विभाग] त्यांच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक-६/४०१/४०/८३, दिनांक १४ जून १९८५ अन्वये विहित केली आहेत. सदर ज्ञापनाची प्रत सोबत जोडली आहे.

[१] संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित आहे किंवा विभागीय चौकशी करण्याचे ठरले आहे, किंवा कसे,

[२] संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द दक्षता प्रकरण प्रलंबित आहे किंवा तसे प्रकरण विचाराधीन आहे किंवा कसे,

[३] सुरक्षिततेच्या बाबतीत शासनाच्या अभिलेखात अर्जदाराविरुध्द आक्षेपार्ह असा विश्वसनीय पुरावा आहे किंवा कसे,

वरील बाबींपैकी कोणत्याही बाबीशी कर्मचारी संबंधित नसेल तर त्याला आवश्यक ते "ना-हरकत प्रमाणपत्र" तात्काळ देण्यास हरकत नसावी.

३. सर्व मंत्रालयीन विभाग, विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिकाराखालील कर्मचाऱ्यांस संबंधित "ना-हरकत प्रमाणपत्र" देताना वरील परिच्छेद-२ मधील मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.

४. सर्व मंत्रालयीन विभागांना अशीही विनंती करण्यात येते की, या परिपत्रकातील सूचना त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सार्वजनिक क्षेत्रातील सर्व उपक्रम, सर्व महामंडळे व मंडळे आणि सांविधिक संस्था यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मीना करंडे,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

शा. म. मु. रोटा/सा. प्र. वि. /एच-५४०[४०००-१०-८५]-१.